Positive Story of Nagpur Rural Police

दिनांक २२/१०/२०२५

नागपूर ग्रामीण पोलीसांची मोठी कारवाई
दादरा आणि नगर हवेली येथे प्रतिबंधित नायलॉन मांजाची निर्मिती करणारा कारखाना उघडकीस; ६ कोटी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री स्नेहल राउत यांच्या पथकाने पर्यावरणास हानिकारक आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या उत्पादन व पुरवठा साखळीविरुद्ध कारवाई करत गोपनीय माहिती, तांत्रिक पुरावे प्राप्त करून सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि बॅकवर्ड लिंकच्या आधारे औद्योगिक परिसर, डेमीनी रोड दादरा आणि नगर हवेली येथील नायलॉन मांजा निर्मितीचा करखाना उघडकीस आणला. सदर कारवाईत प्रतिबंधित नायलॉन मांजा, त्याच्या निर्मितीसाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री आणि इतर साहित्य असा एकूण ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ०८/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा गोंडखैरी येथील व्ही.आर.एल. लॉजिस्टिक यार्डमध्ये कंटेनर क्रमांक जि.जे २१ वाय ३३१८ मधून प्रतिबंधित नायलॉन मांजाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला अटक करून १,२०० नग नायलॉन मांजाच्या प्लास्टिक चक्री किंमत १४,४०,०००/— रुपये, तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला कंटेनर, किंमत २०,००,०००/— रुपये, असा एकूण ३४,४०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. याप्रकरणी कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद, वय ३० वर्षे, रा. उत्तर प्रदेश, याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या पुरवठयाबाबत साखळींचा सखोल तपास सुरू केला. वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या कंटेनरमधून जप्त करण्यात आलेल्या नायलॉन मांजाचा मूळ स्रोत शोधण्यासाठी पोलीसांनी गोपनीय माहितीचे संकलन, तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण करून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. कंटेनर मधील पावत्याच्या आधारे विविध राज्यात तपास पथके पाठविण्यात आले. गुजरात येथील पत्त्याचा शोध घेणे कामी एक पथक गुजरात येथे गेले असता नमुद पत्ता खोटा असल्याची माहीती प्राप्त झाली. तरी सुध्दा तपास पथाकने सातत्याने साखळी पुरावे जोडुन तपास सुरू ठेवला या तपासातून प्रतिबंधित नायलॉन मांजाची निर्मिती दादरा आणि नगर हवेली येथील औद्योगिक परिसरात केली जात असल्याची माहिती समोर आली.त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दादरा आणि नगर हवेली येथे जाऊन तपास सुरू केला. मार्मिक इंडस्ट्रीज या कंपनीबाबत माहीती प्राप्त झाली. सदर कंपनी ही बंद असल्याने पोलीस पथकाने नमुद कंपनीची झडती घेण्याबाबत मा.न्यायालयाला विनंतीपत्र सादर केले. मा. न्यायालयाने विनंती मान्य केल्याने नमुद पोलीस पथकाने स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने दिनांक २१/१०/२०२६ रोजी सदर कंपनी उघडुन पंचासमक्ष सदर ठिकाणी तपासणी व झडती पंचनामा केला. सदर ठिकाणी प्रतिबंधित नायलॉन मांजाची निर्मिती व पॅकिंग करण्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रसामग्री, विविध प्रकारच्या प्लास्टिक चक्रींवर गुंडाळलेला नायलॉन मांजा, कच्चा माल, पावडर, पॅकिंग साहित्य, विविधक कंपन्याचे रबरी स्टॉम्प आणि इतर संबंधित साहित्य आढळून आले.

पंचनाम्यादरम्यान **Gold, Shakti, Cobra, Monokite, Gold kite, Hero plus, Gold shakti, welyn mono** अशा विविध ब्रँडच्या नावांनी तयार करण्यात आलेला नायलॉन मांजा, त्याचे उत्पादन व गुंडाळणी करण्यासाठी वापरण्यात येणारी चक्की, यंत्रे तसेच पॅकिंगसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले. याशिवाय प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या निर्मितीशी संबंधित इतर साहित्याचीही तपासणी करून

जप्तीची कार्यवाही करण्यात आली. सदर कारवाईत ८८ हजारांपेक्षा जास्त नायलॉन मांजाच्या चक्रयांसह एकुण ५ कोटी ०९ लाख ३ हजार १०० रूपयांचा तयार नायलॉन मांजा, ९५ लाखांचे नायलॉन मांजा तयार करणारी यंत्रसामग्री(मशिन) तसेच नायालॉन मांजा तयार करण्याचा कच्चा माल आणि इतर साहीत्य असा एकुण ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईमुळे प्रतिबंधित नायलॉन मांजाची केवळ वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यापुरते मर्यादित न राहता, त्याच्या उत्पादनाच्या मूळ ठिकाणांपर्यंत पोहोचून साखळी उघडकीस आणण्यात नागपूर ग्रामीण पोलीसांना यश मिळाले आहे. नमुद प्रकरणाचा अधिक तपास नागपुर ग्रामीण पोलीस करीत आहे.

नायलॉन मांजाच्या कारखान्याचा पर्दाफाश



गोंडखैरी ते दादरा-नगर हवेलीपर्यंत तपासाची धडक

▶ **गोंडखैरी, वार्ताहर.** गोंडखैरी येथील व्हीआरएल लॉजिस्टिक यार्डमध्ये प्रतिबंधित नायलॉन मांजाची वाहतूक करणाऱ्या कंटेनरवर कारवाई केल्यानंतर नागपूर ग्रामीण पोलिसांनी थेट उत्पादनाच्या मुळापर्यंत तपास केला. या तपासातून दादरा आणि नगर हवेली येथील औद्योगिक परिसरात सुरू असलेल्या नायलॉन मांजाच्या निर्मितीचा पर्दाफाश झाला. पोलिसांनी कारखान्यातून तब्बल ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

८ डिसेंबर २०२५ ला गोंडखैरी येथील व्हीआरएल लॉजिस्टिक यार्डमध्ये कंटेनर जीजे-२१/वाय-३३१८ मधून १ हजार २०० प्लास्टिक चक्रींमधील १४ लाख ४० हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला होता. याप्रकरणी कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद (३०, रा. उत्तर प्रदेश) याला अटक केली होती. कंटेनरसह एकूण ३४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणाचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेने गोपनीय माहिती, तांत्रिक पुरावे आणि वाहतुकीच्या पावत्यांच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली. गुजरातमधील पत्ता खोटा आढळून आल्यानंतरही पोलिसांनी तपास सुरू ठेवला. अखेर दादरा आणि नगर हवेली येथील औद्योगिक परिसरातील मार्मिक इंडस्ट्रीज या कंपनीपर्यंत पोलिस पोहोचले.

पंचासमक्ष घेतली कारखान्याची झाडाझडती

न्यायालयाच्या परवानगीनंतर २१ ऑक्टोबर रोजी पंचांसमक्ष कारखान्याची झडती घेण्यात आली. या कारवाईत ८८ हजारांहून अधिक नायलॉन मांजाच्या चक्री, सुमारे ९५ लाख रुपयांची यंत्रसामग्री, कच्चा माल आणि पॅकिंग साहित्य जप्त करण्यात आले. विविध ब्रँडच्या नावाने प्रतिबंधित मांजाची निर्मिती आणि पॅकिंग होत असल्याचेही उघड झाले. या कारवाईमुळे नायलॉन मांजाच्या पुरवठा साखळीतील महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अंकुश माने यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक स्नेहल राऊत यांच्या पथकाने केली.

लोकमत

नायलॉन मांजा कारखान्यावर 'सर्जिकल स्ट्राइक'

(पान १ वरून) या कारवाईत तब्बल ६ कोटी २६ लाख ४३ हजार ४५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. विशेष म्हणजे, हा कारखाना बाहेरून बंद व आतून उत्पादन सुरू असल्याचे या धाडीत निष्पन्न झाले आहे. गोंडखैरी शिवारातील व्ही. आर. एल. लॉजिस्टिक यार्डमध्ये नागपूर ग्रामीण पोलिसांनी ८ डिसेंबर २०२५ रोजी जीजे-२१/वाय-३३१८ क्रमांकाचा कंटेनर पकडला होता. यात पोलिसांनी कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद (३०, रा. उत्तर प्रदेश) यास अटक करीत त्याच्याकडून १४ लाख ४० हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित मांजा आणि २० लाख रुपयांचा कंटेनर असा एकूण ३४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. याप्रकरणी कळमेश्वर पोलिसांनी गुन्हा नोंदवून सखोल तपासाला सुरुवात केली होती.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने या मांजाच्या पुरवठ्याची साखळी व इतर तांत्रिक पुरावे गोळा करीत त्यांचे विश्लेषण केले. ही कंपनी गुजरातमध्ये असल्याचे समजताच पोलिस तिथे गेले. मात्र, तिथे गेल्यावर कंपनीचा पत्ता खोटा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. खरा पत्ता मिळताच पोलिसांनी दादरा-नगर हवेली गाठून ही कारवाई केली. ही कारवाई पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अप्पर पोलिस अधीक्षक अनिल मस्के यांच्या मार्गदर्शनात एलसीबीचे पोलिस निरीक्षक अंकुश माने, सहायक पोलिस निरीक्षक स्नेहल राऊत, उपनिरीक्षक धवल देशमुख, उमेश फुलबेल, किशोर वानखेडे, आशिष खोडे, इकबाल व राकेश तालेवार यांच्या पथकाने केली.

न्यायालयाच्या परवानगीने झडती

मांजा हा मार्मिक इंडस्ट्रीज नामक कंपनीतील असून, ती कंपनी दादरा-नगर हवेली येथे असल्याचे स्पष्ट होताच नागपूर ग्रामीण पोलिसांनी तिथे जाऊन पाहणी केली. सत्यता पटताच पोलिसांनी न्यायालयात विनंती अर्ज सादर केला. न्यायालयाने परवानगी देताच पोलिसांनी धाड टाकून संपूर्ण कारखान्याची कसून झडती घेतली आणि बिंग फुटले. पोलिसांनी बुधवारी (दि. २१ ऑक्टोबर) या संपूर्ण प्रकरणाचा पंचनामा करून गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली.

लोकमत

नायलॉन मांजा कारखान्यावर पोलिसांचा 'सर्जिकल स्ट्राइक'

६.२६ कोटींचा माल जप्त, दादरा-नगर हवेलीत उत्पादनाचे बिंग फुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर/कळमेश्वर : १० महिन्यांपूर्वी नागपूर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने गोंडखैरी (ता. कळमेश्वर) येथील लॉजिस्टिक पार्कमध्ये प्रतिबंधित नायलॉन मांजा व कंटेनर जप्त केला होता.

याच कारवाईच्या साखळीत नागपूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नुकतीच दादरा-नगर हवेली येथील नायलॉन मांजा कारखान्यावर धाड टाकली. -वृत्त/४



पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत जप्त करण्यात आलेला नायलॉन मांजा.

बंद कारखान्यात उत्पादन सुरू

वरवर पाहता हा कारखाना बंद असल्याचे जरी आढळत असले तरी आतून प्रतिबंधित नायलॉन मांजाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आणि त्या मांजाचा बाजारात पुरवठा सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या ठिकाणी पोलिसांना ८८ हजारांपेक्षा अधिक चक्री, त्यावर गुंडाळलेला नायलॉन मांजा, मांजा तयार करण्यासाठी लागणारी यंत्रे व कच्चा माल व इतर साहित्य आढळून आल्याने ते संपूर्ण जप्त करण्यात आले आहे. एका पथकाने जबलपूर येथेही पाहणी केली असून, कारवाईची प्रक्रिया सुरूच आहे, अशी माहिती एलसीबीचे पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी दिली

Hello Nagpur
Page No. 3 Oct 23, 2026
Powered by: erelego.com

लोकमत समाचार

नागपुर ग्रामीण पुलिस ने दादरा नगर हवेली में पहुंचकर की कार्रवाई

छापा मारकर ₹6.26 करोड़ का नायलॉन मांजा किया जब्त



दादरा नगर हवेली में की गई कार्रवाई में जब्त माल के साथ नागपुर ग्रामीण पुलिस की टीम.

लोकमत समाचार सेवा

नागपुर : प्रतिबंधित नायलॉन मांजे की आपूर्ति के स्रोत का पता लगाते हुए नागपुर ग्रामीण पुलिस ने दादरा और नगर हवेली के डेमीनी रोड स्थित औद्योगिक क्षेत्र में मांजा बनाने वाले एक कारखाने का पर्दाफाश किया है. पुलिस ने बंद पड़ी मार्मिक इंडस्ट्रीज कंपनी की तलाशी लेकर तैयार नायलॉन मांजा, उत्पादन मशीनें, कच्चा माल और पैकिंग सामग्री सहित कुल 6 करोड़ 26 लाख 43 हजार 450 रुपए का माल जब्त किया.

मामले की शुरुआत 8 दिसंबर 2025 को हुई थी. कलमेश्वर पुलिस थाना क्षेत्र के गोंडखैरी स्थित वीआरएल लॉजिस्टिक्स यार्ड में पुलिस ने कंटेनर क्रमांक जीजे-21/वाई-3318 से प्रतिबंधित नायलॉन मांजे की ढुलाई करते हुए एक आरोपी को गिरफ्तार किया था. कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद (30 वर्ष, उत्तरप्रदेश) के खिलाफ मामला दर्ज किया गया था. उस समय पुलिस ने नायलॉन मांजे की 1200 प्लास्टिक चकरियां, जिनकी कीमत 14 लाख 40 हजार रुपए थी और परिवहन में इस्तेमाल कंटेनर, जिसकी कीमत 20 लाख रुपए थी, सहित कुल 34 लाख 40 हजार रुपए का माल जब्त किया था.

जांच के दौरान नागपुर ग्रामीण पुलिस की स्थानीय अपराध शाखा ने कंटेनर में मिले दस्तावेजों और रसीद के आधार पर विभिन्न राज्यों में जांच दल भेजे गए. गुजरात में दिए गए एक पते की जांच करने पर वह फर्जी निकला. इसके बाद पुलिस दल ने दादरा और नगर हवेली के औद्योगिक क्षेत्र में जांच की और मार्मिक इंडस्ट्रीज कंपनी तक पहुंचा. 21 अक्तूबर को स्थानीय प्रशासन के समन्वय से पंचों की उपस्थिति में कंपनी खोलकर तलाशी ली गई.

यह कार्रवाई नागपुर ग्रामीण के वरिष्ठ पुलिस अधीक्षक हर्ष पोद्दार और अपर पुलिस अधीक्षक अनिल म्हस्के के मार्गदर्शन में स्थानीय अपराध शाखा के पुलिस निरीक्षक अंकुश माने के नेतृत्व में की गई. जांच दल में पुलिस निरीक्षक स्नेहल राऊत और अन्य पुलिसकर्मी शामिल थे.

तैयार मांजा, मशीनें और कच्चा माल जब्त

तलाशी के दौरान विभिन्न ब्रांडों के नाम से तैयार नायलॉन मांजा, उसे चकरियों पर लपेटने वाली मशीनें, पैकिंग सामग्री, कच्चा माल, पाउडर, रबर की मुहरें और अन्य संबंधित सामान मिला. पुलिस ने 88 हजार से अधिक नायलॉन मांजे की चकरियां जब्त कीं. तैयार मांजे की कीमत 5 करोड़ 9 लाख 3 हजार 100 रुपए बताई गई है. इसके अलावा करीब 95 लाख रुपए की मांजा निर्माण मशीनरी तथा कच्चा माल और अन्य सामग्री भी जब्त की गई. कुल जब्ती का मूल्य 6 करोड़ 26 लाख 43 हजार 450 रुपए है.


प्रतिबंधित मांजा | ग्रामीण पुलिस की बड़ी कार्रवाई, 6.26 करोड़ का माल जब्त

नायलॉन मांजा बनाने के कारखाने पर मारा छापा

■ **नागपुर, कार्यालय प्रतिनिधि.**

नागपुर ग्रामीण जिले के पुलिस अधीक्षक हर्ष पोद्दार और अपर पुलिस अधीक्षक अनिल म्हस्के के मार्गदर्शन में तथा स्थानीय अपराध शाखा के प्रभारी अधिकारी एवं पुलिस निरीक्षक अंकुश माने के नेतृत्व में सहायक पुलिस निरीक्षक स्नेहल राऊत की टीम ने पर्यावरण के लिए हानिकारक और नागरिकों के जीवन को गंभीर खतरा पैदा करने वाले प्रतिबंधित नायलॉन मांजा की उत्पादन व आपूर्ति श्रृंखला के खिलाफ बड़ी कार्रवाई की है. गोपनीय जानकारी, तकनीकी साक्ष्यों, निरंतर फॉलोअप और बैकवर्ड लिंकेज के आधार पर औद्योगिक क्षेत्र, डेमीनी रोड, दादरा और नगर हवेली में चल रहे नायलॉन मांजा निर्माण कारखाने का पर्दाफाश किया गया है. इस कार्रवाई में प्रतिबंधित नायलॉन मांजा, उसके निर्माण में उपयोग की जाने वाली मशीनरी और अन्य सामग्री सहित कुल 6 करोड़ 26 लाख 43 हजार 450 रुपए का माल जब्त किया गया.





88,000 से अधिक चक्रियां की जब्त

पंचनामा के दौरान गोल्ड, शक्ति, कोबरा, मोनोकाइट, गोल्ड काइट, हीरो प्लस, गोल्ड शक्ति और वेल्यन मोनो जैसे विभिन्न ब्राड के नामो से तैयार किया गया नायलॉन मांजा, उसके उत्पादन और रीलिंग के लिए उपयोग की जाने वाली मशीनें तथा पैकेजिंग सामग्री बरामद की गई. इस कार्रवाई मे 88 हजार से अधिक नायलॉन मांजा की चक्रियों सहित कुल 5 करोड़ 9 लाख 3 हजार 100 रुपए का तैयार नायलॉन मांजा, 95 लाख रुपए की नायलॉन मांजा बनाने वाली मशीनरी तथा कच्चा माल व अन्य सामग्री सहित कुल 6 करोड़ 26 लाख 43 हजार 450 रुपए का माल जब्त किया गया. इस कार्रवाई से नागपुर ग्रामीण पुलिस ने केवल परिवहन करने वालों पर कार्रवाई करने तक सीमित न रहकर, अवैध निर्माण के मुख्य स्रोत तक पहुंचकर पूरी श्रृंखला का पर्दाफाश करने में बड़ी सफलता हासिल की है. इस मामले में आगे की जांच नागपुर ग्रामीण पुलिस द्वारा की जा रही है.

गोंडखैरी में कंटेनर से हुआ था खुलासा : 8 दिसंबर 2025 को नागपुर ग्रामीण जिले के कलमेश्वर पुलिस स्टेशन अंतर्गत मौजा गोंडखैरी स्थित वी.आर.एल. लॉजिस्टिक्स यार्ड में कंटेनर क्रमांक जी.जे. 21 वाय 3318 के माध्यम से प्रतिबंधित नायलॉन मांजा की परिवहन करने वाले आरोपी को गिरफ्तार किया गया था. उस दौरान 1,200 नग नायलॉन मांजा की प्लास्टिक चक्री (कीमत 14,40,000 रुपए) और परिवहन के लिए इस्तेमाल किया गया कंटेनर (कीमत 20,00,000 रुपए) इस प्रकार कुल 34,40,000 रुपए का माल जब्त किया गया था. इस मामले में कंटेनर चालक छविनाथ मोहन निषाद, (30), उत्तर प्रदेश निवासी के खिलाफ कलमेश्वर पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया गया है.

मूल स्रोत की तलाश में दादरा और नगर हवेली तक पहुंची पुलिस : इस मामले की जांच के दौरान नागपुर ग्रामीण पुलिस की स्थानीय अपराध शाखा ने प्रतिबंधित नायलॉन मांजा की आपूर्ति श्रृंखला की गहराई से छानबीन शुरू की. परिवहन के लिए इस्तेमाल किए गए कंटेनर से जब्त नायलॉन मांजा के मूल स्रोत का पता लगाने के लिए पुलिस ने गोपनीय सूचनाओं और तकनीकी साक्ष्यों का विश्लेषण कर लगातार प्रयास किए. कंटेनर से मिली रसीदों के आधार पर विभिन्न राज्यों में जांच टीमें भेजी गईं. गुजरात के पते की जांच करने गई टीम को वह पता फर्जी मिला. इसके बावजूद पुलिस टीम ने लगातार साक्ष्यों को जोड़ते हुए अपनी जांच जारी रखी. इस जांच से यह बात सामने आई कि प्रतिबंधित नायलॉन मांजा का निर्माण दादरा और नगर हवेली के औद्योगिक क्षेत्र में किया जा रहा है.

इसके बाद स्थानीय अपराध शाखा की टीम ने दादरा और नगर हवेली पहुंचकर जांच शुरू की और 'मार्मिक इंडस्ट्रीज' नामक कंपनी की जानकारी जुटाई. कंपनी बंद होने के कारण पुलिस टीम ने माननीय न्यायालय के समक्ष कंपनी की तलाशी लेने के लिए विनंती पत्र प्रस्तुत किया. अदालत द्वारा अनुमति मिलने पर पुलिस टीम ने स्थानीय प्रशासन के समन्वय से दिनांक 21 अक्टूबर 2026 को उक्त कंपनी का ताला खोलकर पंचों के समक्ष तलाशी और जब्ती की कार्रवाई की.